नियमीत फौजदारी खटला क्र. **१३८/२०२४**
निशाणी क्र. **२५/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **सुनिता रमाकांत ठाकूर** |
| वय सुमारे | : | ५३ वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | मु. हाशिवरे, देऊळ आळी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

०१. माझ्या घरी मी व माझे पती राहतो. माझ्या मुलींचे लग्न झालेले आहे. माझे पती मजूरी करतात. पती सकाळी ८:१५ वाजता कामावर जातात व सायं. ६:०० ते ६:१५ वाजता घरी परत येतात. झाड तोडण्याबाबत आम्ही हाशिवरे ग्रामपंचायतीकडे सन २०२३ मध्ये अर्ज दिला होता. झाडाच्या फांद्या आमच्या पत्र्यावर येवून आदळतात व झाडाची मुळे आमच्या टॉयलेटच्या टाकीमध्ये जातात. तसेच फांद्यांचा पावसाळ्यात आम्हाला भरपूर त्रास होतो. त्याबाबत आम्ही अर्ज दिला होता.

०२. दि. ०९/०६/२०२४ रोजी सायं. ०४:०० वाजताच्या सुमारास घटना घडली होती. त्यावेळी मी घरात झोपलेले होते. त्यावेळी घराचा दरवाजा जोरजोरात ठोकला व जोरजोरात आवाज केला. मी कोण आहे म्हणून विचारुन दरवाजा उघडला. दरवाजा उघडला असता समोर भूषण गोपीनाथ गावंड उभा होता. मी दरवाजा उघडला असता तो म्हणाला की, तुम्ही ग्रामपंचायतीमध्ये माझ्या मोठ्या पप्पांची तक्रार का दिली त्यामुळे गावात आमची इज्जत गेली. त्याने 'मादरचोद' अशी शिवीगाळ केली. तुझ्या नवऱ्याला व दोन्ही मुलींना बघून घेईन अशी धमकी दिली. त्याने मला धक्का दिला त्यामुळे मी दरवाजातून सोफ्यावर

जावून पडले. त्यानंतर मी त्याला ढकलत ढकलत बाहेर काढले व कशीतरी दरवाजाची कडी लावली. मी आत होते व खिडकीतून बघत होते. त्यानंतर गोपीनाथ गावंड, किसन गावंड व तुषार गावंड आले व मला दमदाटी दिली व 'मादरचोद' अशी शिवी दिली. त्यानंतर त्यांनी तोडफोड केली. त्यांनी पत्र्याची, पन्हेलाची काठीने तोडफोड केली, मातीच्या कुंड्या ओट्यावरुन खाली ढकलून दिल्या. त्यानंतर पाण्याचा पिंप ढकलून दिला.

०३. त्यानंतर मी माझ्या पतीला फोन केला व लगेच येण्यास सांगितले. मी माझ्या मुलींना फोन करुन सदर घटनेबाबत कळविले व येण्यास सांगितले. त्यानंतर मुलगी व पती आल्यानंतर आम्ही सायंकाळी पोयनाड पोलीस ठाण्यात गेलो. तेथे आम्ही तक्रार दिली. तेथे आमची तक्रार घेतली नाही. दुसऱ्या दिवशी आम्ही पी.एस्. ऑफीसमध्ये आलो. तेथे आम्ही घटना सांगितली. त्यांनी आम्हाला पुन्हा पोयनाड पोलीस ठाण्यात जाण्यास सांगितले व तेथे तक्रार देण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी ११ तारखेला आम्ही पोयनाड पोलीस ठाण्यात गेलो व तक्रार दाखल केली. तक्रार मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली तक्रार तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. २६** देण्यात येते.

०४. १२ तारखेला पंचनामा करण्यात आला. घटनास्थळ मी पोलीसांना दाखवले. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेन. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत. माझा न्यायालयात जबाब नोंदवण्यात आला. आता मला तो जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. पी–२** म्हणजेच **निशाणी क्र. २७** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत</u>** :

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या आजूबाजूला घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझ्यात पूर्वीपासून संबंध चांगले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व आमच्यात वाद होत असल्याने मी आरोपींविरुद्ध हाशिवरे आउटपोस्ट येथे एन्.सी. दाखल केली होती.

०६. हे म्हणणे खरे आहे की, ०९ तारखेला मी पोयनाड पोलीस ठाण्यात एन्.सी. दाखल केली होती. साक्षीदारास उलटतपासात एन्.सी. क्र. १९०/२०२४ दाखवण्यात आली. उलटतपासात कागदपत्र दाखवण्यात आल्याने त्यास **निशाणी क्र. डी–१** म्हणजेच **निशाणी क्र. २८** देण्यात येते. एन्.सी.वर माझे नाव आहे त्यातील मजकूर बरोबर नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर एन्.सी.मध्ये मी पोलीसांना घटनेबाबत सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोयनाड पोलीस ठाण्यात गेले त्यावेळी माझी मुलगी, माझे पती सोबत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझी मुलगी वकील आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अन्य दोन वकील पोयनाड पोलीस ठाण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीसांना फिर्याद देत होते त्यावेळी माझी मुलगीही त्यांना घटनेबाबत सांगत होती.

०७. ०९ तारखेला मी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझे पती व मुलीने ठरविले होते की तक्रारी अर्ज करायचा. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी ठरवले की, आरोपींविरुद्ध तक्रारी अर्ज करायचा. हे म्हणणे खरे नाही की, तसा अर्ज मी वरिष्ठांकडे दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारी अर्ज पी.एस्. ऑफीसला दिला होता. मी अलिबाग येथे ४:०० ते ४:१५ वाजताच्या सुमारास आले होते. १० तारखेला मी दिवसभर

पी.एस्. ऑफीसला होते. त्यादिवशी साहेब ३:०० ते ३:३० वाजता आले होते. त्यानंतर आम्ही त्यांना भेटलो होतो. १० तारखेला मी पी.एस्. ऑफीसला गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, पी.एस्. ऑफीसला माझी मुलगी होती.

०८. ११ तारखेला मी पोयनाड पोलीस ठाण्यात सकाळी ११:०० वाजता गेले. त्या दिवशी मी किती वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात होते हे मला आठवत नाही. मी फिर्यादीवर किती वाजता सही केली हे मला आठवत नाही. मी फिर्याद वाचून पाहिली होती. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटना ४:१५ वाजता घडली नव्हती. घटना ४:०० ते ४:१५ वाजताच्या दरम्यान घडली होती. तथाकथीत घटना २० ते २५ मिनिटे चालू होती. आजूबाजूचे लोक जमले नव्हते.

०९. पोलीसांना फिर्याद देताना मी पोलीसांना सांगितले होते की, झाडाच्या फांद्या आमच्या पत्र्यावर येवून आदळतात व झाडाची मुळे आमच्या टॉयलेटच्या टाकीमध्ये जातात तसेच फांद्यांचा पावसाळ्यात आम्हाला भरपूर त्रास होतो. सदर बाब माझ्या फिर्यादीमध्ये नमूद आहे.

१०. पोलीसांना फिर्याद देताना मी पोलीसांना सांगितले होते की, जोरजोरात आवाज केला. साक्षीदार सांगते की, जोरजोरात कडीचा आवाज केला असे नमूद आहे. पोलीसांना फिर्याद देताना मी पोलीसांना सांगितले होते की, त्यानंतर मी त्याला ढकलत ढकलत बाहेर काढले व कशीतरी दरवाजाची कडी लावली व मी खिडकीतून बघत होते.

११. पोलीसांना फिर्याद देताना मी पोलीसांना सांगितले होते की, त्यानंतर गोपीनाथ गावंड, किसन गावंड व तुषार गावंड नेण्याकरीता आले होते. साक्षीदार सांगते की, सदर बाब माझ्या फिर्यादीत नमूद आहे. फिर्याद देताना मी पोलीसांना

सांगितले होते की, त्यावेळी त्यांनी मला 'मादरचोद' अशी शिवीगाळ केली. पोलीसांनी माझ्या फिर्यादीत 'मादरचोद' शिवी लिहीलेली नाही.

१२. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या म्हणण्याप्रमाणे फक्त भूषण याने तोडफोड केली होती इतरांनी काही केले नव्हते. मी पोलीसांना सांगितले होते की, 'काठीने' तोडफोड केली होती. माझ्या फिर्यादीमध्ये काठीने तोडफोड केल्याचे नमूद नाही.

१३. काठी भूषणच्या हातात होती. काठीची लांबी रुंदी मला सांगता येणार नाही. काठी अंगणातच पडलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, १२ तारखेपर्यंत काठी तिथेच होती. हे मला आठवत नाही की, ती काठी मी उचलून ठेवली. हे मला आठवत नाही की, काठी दोन दिवस माझ्या घरासमोर होती.

१४. पोयनाड पोलीस ठाण्याने माझी तक्रार घेतली नाही ही बाब मी तक्रारीमध्ये सांगितली होती. मला हे आठवत नाही की, फिर्याद देताना मी सांगितले होते की, आम्ही पी.एस्. ऑफीसला गेल्यानंतर पी.एस्. ऑफीसने आम्हाला फिर्याद देण्यासाठी पुन्हा पोयनाड पोलीस ठाण्यात पाठविले होते. हे मला माहीत नाही की, आरोपीने माझ्या व माझ्या पतीविरुद्ध तक्रार दिली होती. तथाकथीत घटनेच्या दिवशी माझ्या घरी माझे नातेवाईक आले नव्हते. त्या दिवशी पोयनाड पोलीस ठाण्यात मी, माझे पती व मुलगी गेलो होतो. त्या दिवशी माझी छोटी मुलगी व जावई आले होते. माझी छोटी मुलगी व जावई पोलीस ठाण्यात आले होते.

१५. मी कोर्टात जबाब देताना सांगितले होते की, माझी छोटी मुलगी व जावई आले होते व त्यानंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. मी जबाब देताना सांगितले होते की, मी त्याला मोठमोठ्याने दरवाजा ठोकण्याचे कारण विचारले

होते. भूषणच्या हातात काठी होती ही बाब मी कोर्टापुढील जबाबात सांगितली नव्हती. मी खिडकीतून तथाकथीत प्रकार बघत होते ही बाब देखील माझ्या कोर्टापुढील जबाबात नमूद नाही.

१६.        १२ तारखेला रात्री ०७:४५ वाजता पोलीस माझ्या घरी आले होते. त्या दिवशी पोलीस किती वेळ होते हे मला आठवत नाही. मी पोलीसांना तुटलेले पन्हेल, कुंड्या दाखवल्या होत्या. त्यावेळी आमच्या गावातील रांजणगांव येथील पोलीस पाटील, पोयनाड पोलीस ठाण्यातील पोलीस, मी व माझे पती होतो. त्यावेळी मी पोलीसांना काठी दाखवली होती. हे मला माहीत नाही की, पोलीस ती काठी घेवून गेले होते. हे मला आठवत नाही की, पोलीस गेल्यानंतरही ती काठी तिथेच होती. हे मला आठवत नाही की, तथाकथीत घटनेच्या वेळी काठी अंगणात पडलेली होती. हे मला आठवत नाही की, पोलीस एक तास होते किंवा नाही. मी पोलीसांना ग्रामपंचायतीत केलेल्या अर्जाची प्रत दाखवली होती त्यांना दिली नव्हती.

**मध्यान्हामुळे उलटतपासतहकूब करण्यात आला**.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.                                        ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१९/११/२०२५**.                 मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास आरोपींकरीता वकील श्री. दर्शन बैकर यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** :

१७.        हे म्हणणे खरे आहे की, आमच्या घराच्या बाजूला अरुण ठाकूर याचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मागच्या बाजूला रत्नाकर

ठाकूर यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, घरासमोर विलास म्हात्रे यांचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे घर आमच्या घराला लागून आहे. आरोपींचे घर व आमचे घर यांतील अंतर मी सांगू शकत नाही. आरोपींचे घर आमच्या घराच्या उजव्या बाजूला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमची संडासची टाकी आरोपींच्या जागेत निघते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरात ज्या झाडांच्या कुंड्या ठेवलेल्या आहेत त्यांचे पाणी आरोपींच्या अंगणात जाते.

१८. हे मला आठवत नाही की आरोपींनी माझ्या मुलीच्या लग्नात सर्व काम केले होते. हे मला आठवत नाही की, आरोपी माझ्या मुलीच्या लग्नात होते किंवा नाही. मी तथाकथीत प्रकाराच्या वेळी आरडाओरडा केला नाही. पोलीस रात्री आले त्यावेळी कुंड्या पडलेल्याच होत्या. पाण्याचे ड्रम मी सरळ करुन ठेवले होते. मी ५:०० वाजता सर्वांना फोन केला होता.

१९. हे म्हणणे खरे आहे की, हाशिवरे येथे पोयनाड पोलीस ठाण्याचे आउटपोस्ट आहे. हाशिवरे पोलीस आउटपोस्ट माझ्या घरापासून १० ते १५ मिनिटांवर आहे. त्या दिवशी मी हाशिवरे आउटपोस्टला गेले नव्हते. पोयनाड पोलीस ठाण्यातून आम्हाला सांगण्यात आले नव्हते की, हाशिवरे आउटपोस्टला जा. मी डॉक्टरकडे गेले नव्हते. मला डोक्याला सूज आली नव्हती. घरात दरवाजाच्या समोर सोफा आहे. मला दिशा सांगता येणार नाही. पोलीस घरात आले होते. पोलीसांनी सोफा पाहिला होता.

२०. हे म्हणणे खरे आहे की, आमच्यात व आरोपींमध्ये पूर्वीपासून झाडावरुन वाद होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींविरुद्ध तक्रारी अर्ज दिला होता त्यामुळे आमचे व त्यांचे संबंध खराब झाले होते. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपी आमच्याविरुद्ध अर्ज देणार होते त्यामुळे आम्ही खोटी तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी भूषण आमच्या घरी आला, शिवीगाळ केली, दरवाजा ढकलला, तोडफोड केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद व खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१९/११/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.